Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

January-2020

SPECIAL ISSUE-CCIII

# Bhartiya Vicharvant,Humanities



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari -
Deptt. of Economics,
G.S.Tompe
Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

B.Aadhar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with OKEN Scanner

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | म. ज्योतीबा फुले यांचे सामाजिक विचार | प्रा.धर्मदास विश्वनाथ घोडेस्वार | 1 |
| 2 | संत गाडगेबाबांचा शैक्षणिक दृष्टिकोन | डॉ.प्रवीण घारपुरे | 5 |
| 3 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार | डॉ. राष्ट्रपाल गणवीर | 8 |
| 4 | महात्मा फुले आधुनिक भारताचे समाजक्रांतीकारक | डॉ.पंकज पुं. कावरे | 13 |
| 5 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही | डॉ.तनय पी.गोडे | 16 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विद्युत विकासातील नियोजन आणि लोकशाही | प्रा. विजय आर.गायकवाड | 20 |
| 7 | रूसोच्या विचाराचा भारताच्या जडणघडणीत प्रभावाचे अध्ययन | डॉ.प्रशांत दिवाकर सातपुते | 25 |
| 8 | महाराष्ट्राच्या जडनघडनीत शिवाजी महाराजांचे आर्थिक योगदान | डॉ. देवेन्द्र एस. रंगाचार्य | 28 |
| 9 | जॉन जेक्स रूसो , प्लेटो यांचे शैक्षणीक, धार्मीक , सामाजीक व राजकीय विचार | डॉ.प्रा.जयश्री प.देशमुख | 32 |
| 10 | महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार | डॉ. दयाश्री वि. कोकाटे | 34 |
| 11 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या शेती विषय सुधारणा | डॉ. मुकुंद रामदास दातीर | 37 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मविषयक विचार | प्रा. अपर्णा संदेश खैरमोडे | 41 |
| 13 | पश्चिम विदर्भातील कोळी शेतकऱ्यांच्या समस्या | प्रा.डॉ.अनिल वानखडे | 46 |
| 14 | महात्मा गांधीयांचे शैक्षणिक विकासातील योगदान. | प्रा.डॉ.गोकुल शामराव डामरे | 49 |
| 15 | स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक व राष्ट विकासातील योगदान | श्री. गणेश किसन ठोंबरे | 54 |
| 16 | "प्लेटो यांचे शैक्षणिक योगदान" | प्रा.रामदास यु. वायभासे | 58 |
| 17 | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक व राष्ट विकासातील योगदान. | प्रा.डॉ.मुश्ताक अहमद शाह | 63 |
| 18 | श्री. अरविंद घोष यांचे शैक्षणिक विकासातील योगदान. | प्रा.दिपक लक्ष्मण नरवास | 69 |
| 20 | जॉन ड्युई यांचे शैक्षणिक विकासातील योगदान | प्रा.डॉ.सुषमा एम.गणोजे | 76 |
| 21 | स्त्रीवादी विचारप्रवाह व स्त्रीवादी समीक्षा | डॉ सौ अलका सं ईंदापवार | 80 |
| 22 | ग्रामीण भागातील प्राथमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या शैक्षणिक व व्यावसायिक अभिरूची आणि त्यांना येणाऱ्या अडचणीचे चिकित्सक अध्ययन | अल्का ठाकरे (जेऊरकर) /डॉ. जी. के. पेटकर | 83 |

| | | |
|---|---|---|
| 23 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा आढावा<br>आकाश शेषराव बांगर | 88 |
| 24 | लोकनायक बापूजी अणे यांच्या नेतृत्वातील विदर्भातील जंगल सत्याग्रह – एक आलोचनात्मक अभ्यास<br>कु. वर्षा शं. काटेखाये | 91 |
| 25 | भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुदृढतेसाठी बुद्धाच्या आर्थिक विचारांची आवश्यकता<br>प्रा. डॉ. मोहन दे. वानखडे | 95 |
| 26 | भारतीय जागतीकरणाचा कृषी व्यवसायावर होणारा परिणाम<br>विणा एस काकडे | 99 |
| 27 | भारतातील ग्रामीण दारिद्रय निर्मूलन एक दृष्टीक्षेप<br>प्रा. डॉ. अे. जी. वानखडे | 104 |
| 28 | कर्मचारी भविष्य निधी संघठन योजना<br>प्रा. डॉ. कु. ताई बा. उके | 107 |
| 29 | भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आगामी काळातील आव्हाने<br>डॉ. वर्षा गंगणे | 110 |
| 30 | ग्रामीण दारिद्रय आणि दारिद्रय निर्मूलन<br>प्रा. डॉ. संजय पी. पिठाडे | 117 |
| 31 | जागतिक दहशतवाद – कारणे आणि उपाय<br>डॉ. प्रा. अश्विनी अविनाश खापरे | 121 |
| 32 | सेवा क्षेत्रावर पर्यावरणातील घटकांचा होणारा परीणाम<br>डॉ. अनिल श्री. खांडेकर | 123 |
| 33 | उस्मानाबाद तालुक्यातील साक्षरता एक भौगोलीक अभ्यास<br>प्रा.चव्हाण अे.डी. /डॉ.गुळवे एम.एन | 129 |
| 34 | प्राचीन व मध्ययुगीन काळातील मराठी साहित्य व कृषिअर्थव्यवस्था<br>डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे | 133 |
| 35 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री दास्य विरोधी कार्य<br>डॉ. सिद्धार्थ एन. बुटले | 138 |
| 36 | वृध्दापकाळ: वर्तमान समाज जीवनातील आव्हाणे व उपाययोजना<br>डॉ. धनराज चौखुंडे | 141 |
| 37 | भंडारा तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील २०१९ वर्षाचा इयत्ता १०वी गणित विषयाच्या निकालाचा तुलनात्मक अभ्यास.<br>पांडुरंग टिकाराम कोळवते / डॉ. अमोल मांडेकर | 143 |
| 38 | विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आर्थिक दृष्टिकोन<br>डॉ. प्रज्ञा जुनघरे | 150 |
| 39 | बुध्दकालीन औशधविज्ञान : भेसज्जखन्धक<br>डॉ.मनोहर तुळशीराम कुंभारे | 153 |
| 40 | भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री सक्षमीकरण विषयक विचाराचे व कार्याचे योगदान<br>प्रा.डॉ.प्रशांत वामनराव खेडकर | 159 |
| 41 | महात्मा जोतीराव फुले यांचे महिला विषयक विचार<br>डॉ. ज्योती शेषराव दिघाडे | 162 |
| 42 | डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे सामाजिक सुधारणा विषयक विचार<br>डॉ. किशोर उत्तमराव राऊत | 164 |




Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 43 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि जागतिकीकरण — एक अध्ययन<br>डॉ. श्रीहरी मारोतीराव सानप | 166 |
| 44 | संशोधनात कॉम्प्यूटरचे महत्व डॉ. एस.पी.निंभोरकर | 172 |
| 45 | A Visionary Educationist Mahatma Jotirao Phule: A Micro Study<br>**MR. Digambar R. Nagarthawar** | 174 |
| 46 | Women Empowerment & Gandhiji **Dr. Shipra Singam** | 179 |
| 47 | From Buddhism to Transcendentalism is Cross Cultural Relations.<br>**Asst. Prof. Smita P. Mohod** | 182 |
| 48 | Karmaveer Bhaurao Patil's Mass Education Movement **Dr. S. M. Bhowate** | 184 |
| 49 | Social Issues In the writings of Rabindranath Tagor **Dr.Sachin S. Matode** | 188 |
| 50 | Economic Thoughts of Mahatma Gandhi **Dr. Liladhar D. Kharpuriye** | 190 |
| 51 | Mahatma Gandhi and India's Partition **Naveen Sharma** | 193 |
| 52 | Early Childhood Care and Education and contribution of Dr. Maria Montessori **Dr.Sampada Naseri** | 197 |
| 53 | Swami Vivekananda's Views on Education **Chitra Majumdar** | 200 |
| 54 | Translation, Culture and Global Era **Prof. Mahendra Telgote** | 203 |
| 55 | Demonetization And Its Impacts On Indian Economy **Dr. Arun N. Kamble** | 206 |
| 56 | Foregin Direct Investment Relating –Some Issue" **Dr. P.Y.Nimbalkar** | 210 |
| 57 | Distribution Of Groundnut Crop And Productivity In Amravati District<br>**Sagar P Padole** | 212 |
| 58 | महात्मा जोतीराव फुले यांच्या साहित्यातून व्यक्त होणारा लिंगभाव दृष्टिकोन<br>**डॉ. निशा शेंडे** | 217 |
| 59 | इलाचंद्र जोशी के मनोवैज्ञानिक उपन्यास : एक दृष्टिक्षेप **डॉ. रवींद्रकुमार शिरसाट** | 221 |
| 60 | Gender Equality: Matching The Constitutional Mandate And Ground Reality<br>**Dr. S.P. Yadgirwar** | 229 |
| 61 | वास्तविकतेची धग मांडणारी कलाकृती रत्नाकर मतकरींचे लोककथा 78:एक चिकित्सा<br>डॉ. प्रफुल्ल गवई | 233 |
| 62 | Human Rights & Youth Responsibilities **Sudhir S. Muley** | 239 |




Scanned with OKEN Scanner

B.Aadhar International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - (SJIF) - 7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
January 2020

# वास्तविकतेची धग मांडणारी कलाकृती रत्नाकर मतकरींचे लोककथा 78:एक चिकित्सा

डॉ. प्रफुल्ल गवई
एस.पी.एम. कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली

मराठी साहित्याला समृध्द करण्यासाठी अनेक नाट्यसंहितेचा जन्म झाला. आपआपल्या काळातील वास्तविकतेची मांडणी करून समाजाला अंतर्मुख केले. त्यानाट्यसंहिता चा विषय आजचा विषय झालेले दिसून येतो. एकंदर नाट्य चळवळीला समृध्द करण्यासाठी अनेक लेखकांनी आपली लेखनी झिजवली आहे. त्या नाटकांतून विविध अगांनी मांडणी करून समाज प्रबोधना सह मनोरंजन देखील केले आहे. या नाट्य चळवळीतील महत्वाचे नाव म्हणजे रत्नाकर मतकरी. त्यांनी प्रौढासाठी-वाऱ्यावरचा मुशाफिर, वर्तुळाचे दुसरे टोक, ब्रम्हहत्या,बिराड वाजलं, प्रेम कहाणी, आरण्यक, समोरच्या घरात, लोककथा 78: तसेच मुलांसाठी मधूमंजिरी, कळलाच्या कांद्याची कहाणी, निम्मा शिम्मा राक्षस, गाणारी मैन्ना, अचाट गावची अफाट मावशी, अदृश्य माणूस, राक्षस राज जिंदाबाद, इंद्राचं आसन नारदाची शेंडी, अलबल्या गलबल्या अनेक नाटकं लिहून ठेवली आहे.

या काळातील नाटककार रत्नाकर मतकरी यांचे 'लोक कथा -78' हे नाटक होय. "लोककला 78: म्हणजे लोककथा 1978 नव्हे, कैक वर्ष आगेमागे कानोसा घेऊन पहा, प्रत्येक संवत्सराची हीच कथा आहे. लोककथा' 78: म्हणजे लोककथा क्रमांक 78 नव्हे तसा. तिचा क्रमांक आहे सत्राशे साठ ! नित्याची कहाणी. पुन:पुन्हा घडत राहिलेली. बंद कानांना आणि मंद मनाना सवयीची झालेली. वास्तविक ही कथादेखील नव्हे. न कथा , न कहाणी, न हकिकत. अनेक हकिकतींच्या साधारण विभाज्यावर अधारलेली ही कैफियत आहे एक." 1 ही कलाकृती नाट्यरचना तंत्राला धेद देऊन, आशयाच्या आणि प्रत्ययाच्या अंगाने हे नाटक मनाचा वेध येते. बेटकबिलोलीत झालेल्या अत्याचाराच्या बातमीने व्ययीत झालेल्या मतकरींच्या मनाने हा अनुभव व्यक्त केला आहे. "शतकानुशतके पिडल्या गेलेल्या बहुजन समाजाला स्वातंत्र्योत्तर तीस-पस्तीस वर्षांत एकदम ऊर्जितावस्था येईल आणि त्याचा भीषण सामाजिक छळ संपूर्ण थांबले यावर नाहीतरी कुणाही सुज्ञ माणसाचा विश्र्वास बसला नसताचः पण घटनेच्या नावने वारंवार दिल्या गेलेल्या पोकळ आश्र्वासनांनी जणू काही हे सिध्दच केले की भाषणांतून आणि कागदोपत्री, मंत्र्यांपासून सत्र्यांपर्यंत कुणी कितीही बकवास केला वरी बहुजनसमाज जिथे आहे तिथेच राहणार आहे: किंबहुना अधिकच गर्तेत जाणार आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने केलेल्या अनेकविध सुधारणांचा (पुस्तकात अंतर्भाव केलेली चित्रे पाहा) प्रत्यक्षात अणूभरही फायदा या नाडलेल्या समाजाला होत आहे का ? अत्याचार, बलात्कार, जाळपोळ आणि हिंसक बळजबरी यांविरुध्द हा पीडित, शोषित समाज एक दिलाने उभा ठाकेल असा आशेचा किरणही आजच्या सत्यपरिस्थितीत दिसत नाही- मग या समाजाला या गर्तेतून वर आणणार कोण ? एखादा 'प्रेषित' की तुमच्या आमच्यासारखे अन्यायाच्या दर्शनाने पेटून उठणारे सामान्यजन ? पण आपण तरी खरोखरच पेटून उठतो का ? रत्नाकर मतकरींनी हाच प्रश्न आपणा सर्वांना विचारला आहे – आजच्या भीषण सामाजिक परिस्थितीचे तितकेच प्रत्ययकारी दर्शन घडविणाऱ्या या नाटकात- लोककथा' 78: मध्ये ! या नाटकातील रौद्रभीषण वास्तव आणि त्याचा मन हादरून टाकणारा प्रत्यय म्हणजे एक अविस्मरणीय 'अनुभव' आहे." 2

एकामागून एक घडत जाणाऱ्या सव्वीस प्रसंगामधून मतकरींनी हे नाटक साकारले आहे. अंधारलेल्या प्रेक्षकगृहातून डबड्याचा आवाज करीत म्होरक्या प्रवेश करतो. डोळ्यांवरची झोप उडावी म्हणून तो प्रेक्षकांना संबोधू लागतो. खेड्यापाड्यातील भरदिवसा होणारे अत्याचार तुम्ही वृत्तपत्रात वाचता पण विचार करीत नाही

असे तो म्हणतो आणि तेवढ्यात रंगमंचावर मास्तर, काही बायका आणि पंधरा-वीस काळी मळकी मानसे प्रेक्षकगृहातून रंगमंचावर प्रवेश करतात. म्होरक्या खेड्यातील अन्याय, अत्याचाराची माहिती रंगमंचावर सर्वासमोर मांडतो. ही मळकी माणसे रिंगण तयार करतात. मास्तराची तयारी होईपर्यंत आपआपल्या गावाची माहिती गाण्याच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवितात. मास्तर ताटली डफावर वाजवून गाणे म्हणतात आणि जगत्या रंगमंचावर प्रवेश करतो. तो कोळी जातीचा आहे पण आपल्या जातीचा उल्लेख करु नये असे तो बजावतो. गाणारे त्याचे नाव घेऊन प्रेक्षकांना त्याची माहिती सांगतात.

दुसऱ्या भागात जगनच्या भाषणाने प्रारंभ होतो. स्वातंत्र्य मिळूनही आपल्या अडाणी व अज्ञानीपणामुळे जमीनदार आपल्यावर अत्याचार करीत आहेत. गावपाटील – सरपंच यांना धडा शिकवण्यसाठी पुढील निवडणुकीत आपल्या पक्षाला मते देण्याची तो विनंती करतो. सर्वजण जगन्याला साथ देतात. त्यानंतर रंगमंचावर एकाचवेळी जगत्याच्या सभेचे दृश्य आणि दुसरीकडे पाटील. सरपंच ग्रामसेवक सोसायटीचा सेक्रेटरी व त्यांच्या बैठकीचे दृश्य दिसते. त्यामुळे संवादाची सरमिरळ ऐकू येते. त्यात परस्परविरोधी प्रश्नोत्तरे ऐकू येतात. पाटील सरपंच ग्रामसेवक ह्या प्रस्थापितांमधे जगन्याच्या निवडणूकीमुळे अस्वस्थता पसरलेली दिसते. जगन्याचा सदरा जाळतो. निवडणूकीत जगन्याचा पक्ष जिंकतो.

तिसऱ्या भागात भाजीबाजारात पाटील आणि नोकर संप्या भाजी विकणाऱ्या नामाच्या टोपलीतील भाजी पिशवीत टाकतात. नाम्या भाजीचे पैसे मागतो. ही मुजोरी आहे असे पाटलाला वाटते. जगन्या अप्रत्यक्षपणे खडसावतो तेव्हा पाटील या बाजारात तुझी दादागिरी चालाचची नाही असे जगन्याला सुनावतो. जगन्यामुळेच ही अडाणी माणसे बिथरली, जातिभेद न मानता त्यांच्या वर आपण लेकरासारखे प्रेम केले हे भेद निर्माण होण्यास जगन्या कारणीभूत आहे. पाटील त्याच्या वडिलांच्या कर्तुत्वाचे पोवाडे गातो. सोसायटीच्या नोकरीचे आमिष दाखवतो. तेव्हा गांधीजयंतीचे हे भाषण पुरे झाले असे जगन्या सुनावतो. पाटील सांगतो की, 'निवडणुकीने गाव बदलत नाही, गाव चालायचा तसाच चालतो गावगाड्याच्या चाकावर मच्छर बसली तरी गाडा थांबत नाही तर उलट मच्छरंच चिरडून जातात'. नाम्या भाजीचे पैसे जगन्याकडे भिरकावतो. जगन्या प्रश्न आठ आण्यांचा नसून पिळवणूकीचा आहे हे समजावून सांगतो. पण गावकरी जगन्यालाच दोष देतात. शेवटी त्यांना हिजडे संबोधतात, आठआणे नाम्याच्या अंगावर फेकून पाटलाच्या वाड्यावर नेऊन दे म्हणत जगन्या निघून जातो.

चौथ्या भागात म्होरक्या रिंगणाच्या बाहेर येऊन राज्य "जन्तेच असो का अनिक कुणाचं पर गावत राज्य व्हतं अजून गाव-गुंडांचंच. शिरीमत जमीदार दिसन् दिस माजत व्हतं. पर गरिबागुरिबांना मातुर रस्त्ययातनं एकलंदुकलं चालायचं म्हर्जी बी धोक्याचं जालं व्हतं." 3 असे म्हणुन निघून जातो. या वेळी दहा-बारा वर्षाच्या मुलीवर बलात्कार होतो. वासंती त्यात मरते. तीन चार गांवकऱ्यानी हे दृश्य पाहिलेले असते. सरपंचाचा मुलगा, पाटलाचा पुतण्या व त्याचा मित्र हे या दुष्कृत्यात सहभागी असतात. पोलिस प्रेताचा पंचनामा करतात.

पाचव्या भागात पोलिसांचा नाकर्तेपणा म्होरक्या बोलून दाखवितो. पाटलाच्या पुतण्याचे नाव घेण्याची कोणीची हिम्मत होत नाही. दरम्यान या दृश्यात रिंगणातील पात्रे चांभार मुलीच्या अत्याचाराची गोष्ट गाण्यातून सांगत असतात. याच भागात पाटील पुतण्याची निर्भत्सना करतात. केवळ आता स्वत:ची अब्रु राखण्यासाठी ते सुटका करणार आहेत कारण या घटनेमुळे जगन्या गावाला आपल्याविरुध्द आवाज उठविल्या शिवाय राहणार नाही याची पाटलाला भिती वाटते. पैशाने त्याचे तोंड बंद होणार नाही. वेगळ्याच उपायानेचं त्याचे तोंड बंद होणार नाही,असे विचार पाटील बोलून दाखवितो.



Scanned with OKEN Scanner

सहाव्या भागात जगन्या आणि त्याचे सहकारी फौजदाराला ' ही चौकशी करता की दहीकाला' असा प्रश्न करतात. चांभाराच्या मुलीच्या जीव म्हणजे काय भुईमुंगाच्या शेंगा वाटत्या काय की कुणीही याव अन् ओरबाडावं? या खडसावण्याने फौजदार चिडतो. दहा दिवसात खूनी पकडत्या गेला पाहिजे असा आग्रह धरतो फौजदाराला त्याचे मोठ्याने बोलणे आवडत नाही. तो दरडावण्याचा प्रयत्न करतो. जगन्या त्वेषाने म्हणतो – हे खरे पोलिस नसून त्यांचे कपडे घालून मूडदे बसले आहेत. त्यांना जागे करण्यासाठी आवाज वाढविणे आवश्यकच आहे पोलिस खुनी माणसांचे साथीदार आहेत लहानू जगन्याला समजावून घेऊन जातो. लोकांच्या चौकशीला तोंड देणे फौजदाराला कठीण होते.

सातव्या भागात पाटलाच्या वाड्याचे दृश्य आहे. पाटील सरपंच बसलेले असतात. सरपंच दारू पित बसलेले आहेत. फौजदार जगन्याने संतू चांभारणीच्या मुलीच्या खुनाच्या चौकशीची धमकी दिल्याचे सांगतो. दहा दिवसांची मुदत दिल्याचे सांगतो. त्यातून जगन्याचा निकाल लावण्याचे ठरते.

आठव्या भागात जगन्या- सावित्रीच्या संवादातून जगन्याची अस्वस्थ मन:स्थिती कळते. सावित्री त्याला समजावते की स्वत:च जीव धोक्यात घालू नका परंतु जगन्या म्हणतो, 'तू काय मला बी त्येच्यवानी गांडू समजलीस ? अग निस्ती चांभारीण गप ऱ्हायली म्हून काय जालं ? गावात खून पडला ह्ये तर खर नां? मग आमी मर्दानी त्यो बघत बसाव ?'4 सावित्रीला पाटलाचे भय वाटते तेव्हा ही पाटलाने विश्वास घात करून मारले तर तू त्याचा जाब विचारण्यास विसरू नकोस असे तो सावित्रीला समजावतो. काही घटलेच नाही असे मानून मुलाकडे पाहुन तिने जगावे असेही तो अप्रत्यक्षपणे सुचवतो. कारण ती जगन्यासारख्या वाघाची बायको आहे.

नवव्या भागात सावित्रीची भिती खरी ठरलेली आहे. पाटलाचे मारेकरी रात्री जगन्याच्या घरावर घाड घालतात. त्याला बेशुध्द होईपर्यंत मारतात. दोईने बांधून फरपटत नेतात. देवळासमोरच्या पेटत्या चितेत त्याच्या देहाचे तुकडे करुन टाकतात. हे सर्व काही कोळी लोक हे दृश्य पाहतात. पण कोणीच पुढे येत नाही.

दहाव्या भागात सावित्रीचा शोक आणि लोकांचे सांत्वनाचा प्रसंग आहे. म्होरक्या त्याचवेळी पुढे येतो. "रडतं काय बसलात ? जगन्यासाठी रडता ?हात् तुमची. आरं, तुमी रडत बसलात तर जगन्याला काय वाटंल ? इतकी वरसं आपुन लोक भाड्यावानी जगलो म्हून तो लडला. संतू, अर, तुज्या पोरीच्या मरनाची दाद लागाया होवी म्हून तो लडला. आन् लडता लडता शूरावाणी म्येला. म्येला – सरगाला ग्येला. त्येचं सोनं जालं. त्येच्यासाठी रडूनशान भागायचं न्हाई माज्या मावल्यांनो. का म्हनाल तर त्येनं सुरू केल्याली ही लडाई आपुन फुडं चालू ठिवायची हाय. त्येच्या मरनाची दाद आपुन मागायची हाय तरच त्येचा आत्मा थंड व्हईल." 5 अशी अन्याया विरुध्द गर्जनाकरून लढायला तयार व्हां असं सांगतो.

अकराव्या भागात हवालदारच्या समोर काही अंतरावरुन काही लोक येत असल्याचे दिसते. त्यावरून जगन्याच्या खुनाची तक्रार आली असे फौजदार सूचित करतो. लहानू सावित्रीच्या वतीने जगन्याच्या खुनाची तक्रार नोंदवितो.

बाराव्या भागात अन्याय निवारण समिती स्थापन झाल्याचे दर्शन घडते. सवित्री संतूबाई इत्यादी बायका दिसतात. जगन्याचा बळी जाऊन दहा दिवस झाले तरी खुनी सापडत कां नाही ? काही तर करावे लागेल अशी चर्चा होते. लहानू नंतर तालुक्याचे मास्तर या समितीची पार्श्वभूमी समजावून सांगतात. पण सभेतील मंडळीना पाटील सरपंचाचे भय वाटते. ते यात सहभागी होण्याबद्दल असमर्थता व्यक्त करतात. मास्तरांनी लिहलेल्या मजकुरावर सही घेऊन पुण्याच्या पेपरवाल्या कडे जाण्याचा बेत सांगतो ही लढाई पुढे चालविण्याचे आपण नवऱ्याला वचन दिल्याचेही ती सांगते. अन्याय निवारण समितीची स्थापना मास्तरांच्या हस्ते नारळ फोडून होते.



Scanned with OKEN Scanner

तेराव्या भागात सावित्री मास्तरांच्या हातातील पत्रके घेऊन प्रेक्षकांमध्ये वाटत फिरते तर रंगमंचावर पाटील एका बाईकडून विडा घेत असतो. फौजदारकडून समितीवाले पुण्याला रिपोर्ट करणार ही बातमी पाटलाला समजते तेव्हा सावित्रीला धडा शिकवण्याची भाषा पाटील करतो. फौजदार सांगतो की आता पुर्वीचे दिवस संपले आता लोकांचे राज्य आले आहे. पाटलांनाही तुमच्या लोकांना सांभळून राहायला सांगा असे फौजदार म्हणतो. तेव्हाच ध्वनीक्षेपकावरून जगन्न्याच्या खुनाची चौकशी व्हावी म्हणून जनतेने साह्य करावे अशी उद्घोषणा करण्यात येते.

चौदाव्या भागात पाटलाचे गुंड सावित्रीला 'तू पेपरवाह्यांना कळवले आहेस तेव्हा गावात जर पेपरवाले आले तर तुझी पातळ सोडून गावांत धिंड काढल्याशिवाय राहणार नाही' अशी धमकी देतात. त्यामुळे ती घाबरून जाते.

पंधराव्या भागात पत्रकार व सरपंच यांच्यातील चर्चा प्रसंग आहे. सरपंच जगन्या गावगुंड होता. त्यानंच बलात्कार केला. त्यातच पोरगी मेली. त्याचा बदला म्हणून कोणीतरी जगन्याचा खुन केल्याचे सांगतात. त्यामुळे पत्रकार आश्चर्यचकीत होतात.

सोळाव्या भागात सवित्रीला पत्रकार आल्याची बातमी सांगायला प्रेक्षकातून एक मुलगी ओरडत सावित्रीकडे येते. पण सावित्री दार ऊघडत नाही. ती दिवा लावून मुलाजवळ येते तेव्हा एक चाकू तिच्यासमोर येऊन पडतो.

सतराव्या भागात पाटील पत्रकारांच्या प्रश्नांना राजकारणी माणसासारखी उडवाउडवीची उत्तरे देतो. 'जगन्या आपल्या पोटच्या मुलासारखा होता गावची सर्वच माणसे आमची आहेत. कुणालाच अटक झाली नसल्याने कोणाची माणस आहेत हे सांगणे कठीण आहे' अन्याय निवारण समित्या चांगल्या असून त्या तयार व्हायला पाहिजे अशी उत्तर देतो. एक पत्रकार यावर पाटलावर खुनाची जवाबदारी आहे' असे लोकमत असल्याचे बोलून दाखविले त्यावर पाटील म्हणतो सध्या मागासलेल्या लोकांच्या प्रश्नाची चलती असल्यामुळे लोक आमच्या सारख्या चांगल्या लोकांना अशा भानगडी मध्ये गुंतवत आहेत.

अठराव्या भागात सावित्रीच्या घरावर गुंड चालून येतात. पेपरवाल्यान बोलावले म्हणून आज आम्ही तुझ लुगडं सोडून गावतून धिंड काढू' म्हणून तिला घराबाहेर काढण्याचा प्रयत्न करतात. ती बाहेर येत नाही असे पाहून झोपडीवर रॉकेल टाकून आला लावतात ती बाहेर येते. ते तिच्या वस्त्रावर हात घालतात तेव्हा ती जोराने ओरडते. त्यावेळी अंधारातून काही दगड गुंडांच्या अंगावर येतात. त्यामुळे भिऊन ते निघून जातात. मग लोक धावून येतात. मुलगा तिच्याजवळ देतात. पाणी टाकून झोपडीची आग विसवतात.

एकोणविसाव्या भागात पत्रकार महादेव कोळ्याशी चर्चा करतात. आपल्याला बोलविण्या मुळे हा हल्ला झाला हे पत्रकार बोलून दाखवितात. या जमीनदारांनी कितीतरी बायांची अब्रु लूटली, कितीकांचे जीव घेतले, कुणाचे हात पाय तोडले, मरणप्राय यातना दिल्या आणि येवढे भयंकर गुन्हे करून देखील कुणीच या मोठ्या लोकांचे वाईट करु शकले नाही. पत्रकार तेव्हा हा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करू असे सांगतात.

विसाव्या भागात म्होरक्या अन्याय निवारण समिती पुढे जे जे घडले ते सांगतो. तेवढ्यात सावित्री काम शोधायाल निघाली असते पण खडीकरणाच्या काम वर देखील जाते.

एकविसाव्या भागात खडीकरणाचे कामही मुकादम तिला देत नाही. गावातील कुणीच तिला भितीमुळे काम देत नाही. इतर मजूरानां सुध्दा तिचे दुःख दिसत नाही फक्त सहानुभूती दाखवतात.

बाविसाव्या भागात पोलिस स्टेशनवर फौजदार, तालुक्याचे इन्सपेक्टर आणि काही पोलिस दिसतात. शेजारच्या गावचे लोक दोन गुंडाना पकडून आणतात. पोलिस गुंडांच्या थोबाडीत मारून कसे सापडलात आणि काय करीत होता म्हणून विचारतात. पण लगेच 'एकही अक्षर बोलायचे नाही.' अशी ताकीद देतात. इन्सपेक्टर



Scanned with OKEN Scanner

फौजदाराला गुंडाबद्दल माहिती विचारतात तेव्हा फौजदार वैमनस्था मुळे कुणालाही पकडून आणतात असे खोटेच सांगतो. एवढेच नव्हे वर ही पाटलाची माणसे असल्याचेही सांगतो. त्यांना पुन्हा थोबाडीत मारून हाकलून देतो. यानंतर दोन कोळी 'अन्याय निवारण समितीला सत्याग्रह करण्याची परवानगी मागायला येतात. फौजदार त्याला आपला विरोध नसल्याचे सांगतात.

तेविसाव्या भागात सावित्री मजुराबरोबर बांधावर माती घालण्याचे काम करीत असते. मुकादमाच्या लक्षात आल्यावर मुकादम सावित्रीला आवाज देऊन उद्यापासुन कामावर येऊ नको म्हणून बजावतात. सावित्रीची उपासमार सुरू असल्याने ती बेशुध्द पडते. इतर स्त्रिया तिला शुध्दीवर आणतात. मुकादम तिला तिच्या कामाचे दोन रुपये देतो. ती पडलेल्याला तुडवणारं समदं जी' असे म्हणत जायल लागते.

चोविसाव्या भागात अन्याय निवारण समिती तील लहानू सावित्रीसह सर्वांना सत्याग्रही म्हणून कलम 37 खाली तुरुंगात टाकण्यात येते.

पंचविसाव्या भागात पाटील संतापलेले असतात. फौजदार पाटलांना सांगतो की नव्या डी. एस. पी. साहेबांनी या प्रकरणात सर्व गुंडांना आठ दिवसात अटक करण्याची ताकीद दिली आहे. हा नवा डी. एस. पी. लाचखाऊ नाही. शिवाय मुख्यमंत्र्यांची तार आल्याचेही सांगतो. शिवाय फौजदार मुंबई पुण्याचे पेपरवाले येऊन गेल्याने ही वार्ता सर्वदूर पसरल्याचे सांगतो. पेपरवाले गावात असतांना गुंडांनी सावित्रीचे घर पेटवून दिल्याने हे सारे घडले असा त्यांचा अंदाज आहे. मुख्यमंत्रांची पाठीब्यामुळे पोलिस तुरूंगातील सत्याग्रहीना सोडतात तर तिकडे पाटील मुख्यमंत्र्यांशी फोनवर बोलत असतात.

सव्विसाव्या भागात रंगमंचावर सावित्री मास्तरांना आलेला सरकारी कागद वाचून दाखविण्याची विनंती करते. मास्तर सांगतात की, जगन्याच्या खुनाची भरपाई व जमीन सावित्री मिळणार आहे. त्यावर सावित्री म्हणते –"दादा, आमची म्हायची पेपरात छापून आली म्हून येवडं तरी जालं. पर आजवर गावतलं इकतं मानूस पायाखालीच चिरडून ग्येलं न्हवं ? आन् आता बी काय, कोन कोन गोरगरीब मुकाट ऱ्हात असत्याल, त्येंच्या नशीबात काळोखच का न्हाई ? '6 ती सरकारी मदत नाकारते. पण म्होरक्या मुलासाठी ही मदत स्वीकारावी अशी समजूत घालतो. यानंतर म्होरक्या प्रेक्षकांना सांगतो. ह्योचं तर आमचा सवाल हाच ? सावित्रीला मिळाली जमीन अन् रोख रक्कम, पन तिला न्याय मिळाला का ? सर्व गप्प बसतात. तेव्हा म्होरक्या बरोबरच्या मंडळीला, ' आपले काम संपले, आपल्या गावाकडे चल' असे सांगतो आणि नाटकाचा पडदा पडतो. आणि एक आवाज येतो.

..... ही लढाई कधी संपेल कां?
या लोककथेला कधी शेवट सापडेल कां ?
आनंदाचा ? विजयाचा ?
कथेतला दैत्य मारला जाऊन कायमचा
.... पण नाही, लोककथेला नसतो शेवट,
तिला फुटत असतात शेकडो फाटे,
खडकातल्या झऱ्यागत.
तेव्हा निदान या लोककथेचा शेवट करू.
तिच्यातल्या पात्रांच्या आशावादावर
म्हणजे त्यांनाही येईल गाता –
एक आशागीत. आणि तुमच्याही ओठांवरची
पुसली जाईल कडवट चव. निराशेची

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - (SJIF) - 7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
January 2020

होतील ते स्वच्छ शहरी स्मितासाठी

(त्यानंतर म्होरक्या आणि इतर सगळे मिळून गाऊ लागतात.)

एकट्या ज्योतीला संगत चारं
जाळान जाळ वाढवा
चारी बाजूनी भाजला वाढवा
.चारी बाजूनी भालजा अंधार
पेटवा, मशाल पेटवा - 7

या गीतात अंधार दूर करण्यासाठी जीवातजीव असेपर्यंत मशाल विझु देऊ नका सतेत माजलेल्याना सिंहासनावरून खाली ओढा, त्यांची सिंहासने जाळा. जाळत्या भुईन नव्या आशांची नवी रोपं लावा असा संदेश दिलेला आहे.

संदर्भ :

1. रत्नाकर मतकरी 'लोककथा 78: प्रस्तावना
2. तैत्रव्र - मलपृष्ठ
3. तैत्रव - पृष्ठ क्र 12
4. तैत्रव - पृष्ठ क्र 20
5. तैत्रव - पृष्ठ क्र 24
6. तैत्रव - पृष्ठ क्र 44
7. तैत्रव - पृष्ठ क्र 45

Scanned with OKEN Scanner